॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

**North Maharashtra University, Jalgaon**

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

पत्रपेटी क्र. ८०, उमविनगर, जळगाव- ४२५००१

दूरध्वनी क्र. (०२५७) २२५७२४८, २४९, २५३ फॅक्स क्र. २२५८४०३, ४०६

'A' Grade

(NAAC Re-Accredited)

3rd Cycle

## Public Relations Office    जनसंपर्क विभाग

जळगाव दि. 1 ( ) उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील संगणकशास्त्र प्रशाळा आणि राज्य मराठी विकास संस्था,मुंबई यांच्यात गिम्प या मुक्त आज्ञावलीचे मराठीकरण या प्रकल्पासंदर्भात सामंजस्य करार करण्यात आला.

राज्य मराठी विकास संस्थेच्या वतीने संगणक क्षेत्रातील विविध संस्थांच्या सहकार्याने कृषि, वैद्यक, उद्योग, व्यापार, विज्ञान, तंत्रज्ञान, प्रसारमाध्यमे आदी व्यवहार क्षेत्रात दृकश्राव्य माध्यमांच्या सहाय्याने उपकरणे व संगणकीय आज्ञावल्या (सॉफ्टवेअर) निर्माण केले जात आहे. त्याला अनुसरून फोटोशॉप सारखे असणारे परंतू मुक्तस्त्रोत सॉफ्टवेअर असणारे गिम्प नावाचे सॉफ्टवेअर याचे संपूर्ण मराठीकरण करण्यासाठी हा करार करण्यात आला आहे. या आज्ञावलीत वापरण्यात येणाऱ्या इंग्लीश संज्ञांना मराठी संज्ञांचे पर्याय देणे, प्रतिमांचे संपादन तसेच गिम्प या आज्ञावलीशी संबंधीत विशिष्ट संज्ञा समजावून देणारे मराठी लेख तयार करणे आदी उद्देश आहेत. या प्रकल्पांतर्गत वर्षभरासाठी सहा विद्यार्थ्यांना मानधन देण्यात येणार आहे.

गतवर्षी राज्य मराठी विकास संस्थेसोबत झालेल्या एक दिवसीय कार्यशाळेत अशा प्रकारच्या सॉफ्टवेअर निर्मितीची आवश्यकता ठळकपणे समोर आली होती. प्रशाचे संचालक प्रा.बी.व्ही.पवार यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.मनीष जोशी, डॉ.स्नेहलता शिरूडे यांनी याबाबतचा प्रकल्प संस्थेकडे सादर केला होता. कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील यांच्या उपस्थितीत झालेल्या या कराराच्या वेळी मराठी विकास संस्थेचे प्रभारी संचालक डॉ.आनंद काटीकर, प्रा.बी.व्ही.पवार, प्रकल्प शोधकर्ता डॉ.मनीष जोशी, डॉ.स्नेहलता शिरूडे उपस्थित होते.

---

उमवि/16/ हस्तदेय/ 2018    दिनांक : 1 फेब्रुवारी, 2018

प्रति,
मा. संपादक / प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत //--
( सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी